बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ → वर्ष १० वे → अंक -३३९ → पाने ४ → किंमत २ रु
Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Monday Date: 13 April 2026 → 10 th Year → 339 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
संपादक - भारत गायकवाड

# महाराष्ट्राचा सूर हरपला

## ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले यांचे निधन



**प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या निधनाने भारतीय संगीतविश्वावर शोककळा पसरली आहे. शनिवारी आशा भोसले यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक होती. अखेर वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. सोमवारी १३ एप्रिल रोजी संध्याकाळी ४ वाजता शिवाजी पार्क येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येतील**

**लोकनायक वृत्तसेवा** – ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगली येथे जन्मलेल्या आशा ताईंनी वडील दीनानाथ मंगेशकर यांच्या संस्कारातून संगीताचे धडे घेतले सुरुवातीच्या संघर्षानंतर त्यांनी हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, तमिळ, तेलुगू अशा २० पेक्षा अधिक भाषांमध्ये १२ हजारांहून अधिक गाणी रेकॉर्ड करून विक्रम प्रस्थापित केला. पिया तू अब तो आजा, दम मारो दम, चुरा लिया है तुमने, ये मेरा दिल यांसारखी गाणी आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. विशेषतः आर.डी बर्मन यांच्यासोबतची त्यांची जोडी भारतीय चित्रपटसंगीताच्या इतिहासातील सर्वात यशस्वी जोड्यांपैकी एक ठरली. आशा भोसले यांचा आवाज म्हणजे केवळ गाणे नव्हते तर प्रत्येक भावनेला जिवंत करणारी जादू होती. त्यांच्या कारकिर्दीसाठी पद्म विभूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. वडिलांच्या निधनानंतर अगदी लहान वयातच आशा भोसले यांनी गायनाला सुरुवात केली.त्यांचे पहिले मराठी गाणे चला चला नव बाळा (१९४३) तर हिंदीतील सुरुवातीच्या गाण्यांमुळे त्यांना चित्रपटसृष्टीत ओळख मिळाली.

आशाताईंनी केवळ फिल्मी गाणीच नाही तर गझल, भजन, कव्वाली,पॉप, मराठी भावगीते, बंगाली आणि इतर प्रादेशिक गाणी गायली आहेत. आशा ताईंच्या आवाजात रोमॅन्स, विरह, खट्याळपणा आणि गझलेची नजाकत एकाच वेळी अनुभवायला मिळत होती. त्यांचा आवाज म्हणजे भारतीय संगीतविश्वाचा एक अमर ठेवा आहे. गेल्या ८ दशकांहून अधिक काळ आपल्या सुरेल, बहुआयामी आणि जादुई आवाजाने कोट्यवधी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हा स्वर आज कायमचा शांत झाला आहे
















लोकनायक

सोमवार दि.१३ एप्रिल २०२६



# गावच्या वेशीवर कचऱ्याचे ढिगारे सर्वत्र घाणतरी कसा मिळाला किरोडा ग्रामपंचायतला बहुमान जनतेत तीव्र संतापाची लाट

**लोकनायक वृत्तसेवा –** लोहा – मुख्यामंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत किरोडा ग्रामपंचातला कसा मिळाला बहुमान कोणत्या निकषावर मिळाला कारण गावामध्ये सर्वत्र घाण कचऱ्याचे उकंडे रस्ते बरोबर नाहीत पाणी जाण्यासाठी नाल्या नाहीत असा बहुमान मिळवून अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक करून बहुमान मिळून घेण्याऱ्या ग्रामसेवकाची त्वरित चौकशी करावी असे गावकर्यांचे मनणे आहे गावात कोणत्या सुविधा नाहीत पण अधिकाऱ्याला जवळ धरून चालवलेले कागदी मेळ आहे. पाच लाख रुपये खर्च करून जिमची योजना आणली पण ती जिम युवकांना व्यायाम करण्यासाठी पण ती जिम तळ्यात बसवल्या मुळे पाच लाख रुपये पाण्यात गेले तरी हे पैसे ग्राम सेवक व सरपंचाकडून वसूल करावे अशी मागणी पण होत आहे. किरोडा गावात ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. प्रमुख पिण्याच्या पाण्याचा स्रोत असलेल्या विहीर बोअरवेलजवळच घाण पाण्याचे डबके साचत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तरी ही ग्रामपंचायतचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत आहे. यावर्षी उन्हाची दाहकता व पाण्याची ही गरज पाहता येणाऱ्या काळात ग्रामपंचायतीच्या वतीने पाण्याचे नियोजन करणे गरजेचे असून, पाण्याचा स्रोत असलेल्या बोअरवेलच्या बाजूस गावातील नाल्याचे व स्वच्छतागृहांचे घाण पाणी वाहत जाऊन डबके साचून तेच पाणी विहिरीत व बोअरवेलमध्ये पाझरत असल्याने गावकऱ्यांचे आरोग्य आता धोक्यात येण्याची शक्यता बळावत आहे. गावात ठिकठिकाणी नाल्या भरल्याचे दिसत आहे. बऱ्याच ठिकाणी नाली असूनही त्या नाल्याचा उपसा व साफसफाई नसल्याने नाल्याचे पाणी रहदारीच्या मार्गावरच डबके साचले असल्याने सगळीकडे दुर्गंधी पसरत आहे तर अनेक ठिकाणी शौचालयांचे पाईप रस्त्यावरच साचत असून, त्या विहिरी जवळ पिण्याच्या पाण्याच्या बोअर असल्याने ते घाण पाणी बोअर व विहिरीत पाझरत असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. किरोडा ग्रामपंचायत असून, गावात कुठेही कचराकुंडी नाहीत किंवा गावत साफसफाई होत नाही. जिकडे तिकडे दुर्गंधी, काही ठिकाणी घाण कचरा वर्षभर तसाच पडून राहतो. मात्र याकडे कोणाचेही लक्ष नसल्याने या घाणीमुळे गावकरी त्रस्त आहेत. रस्त्याच्या बाजूस मारुती मंदिराजवळ विद्युत पोल वाकला असल्याने मोठ्या अपघाताचाही धोका निर्माण झाला आहे तर रस्त्याच्या बाजूस अतिक्रमण करून जागा काबीज केल्या असून, अतिक्रमणधारकांकडून सी. सी. रस्त्यावर केलेले अतिक्रमण काढून रस्ते मुक्त करावेत तसेच ग्रामपंचायत व ग्रामसेवक, प्रशासकाने लक्ष द्यावे व किरोडा गावातील जनतेला न्याय द्यावा, अशी मागणी माजी उपसरपंच सुरेश जोंधळे यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



## जाहीर नामा

जा क्र. / बीनप /कावि /वसुली –
कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक –//२०

**संपादक साहेब**
**दैनिक**
**बीड**

**शपथपत्र, लेआउट, ७११२**

प्रकरण मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरुस्ती) बाबत.

**अर्जदाराचे नाव व पत्ता – यशवंत भगवानराव सारंगकर**
**बीड राहणार**

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर.क्र.//सव्हे नं.– १०४ तरफ गिराम पैकी क्षेत्र –२५६.४६ चौ.मी प्लॉट क्र–७२

**वर श्री/सौ.–स्वत:**

चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसांच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

**चतु: सिमा**
**पुर्व –अरुण घोडके यांचा प्लॉट**
**पश्चिम – वीस फुटाचा रस्ता**
**दक्षिण– पिंपरगव्हाण रोड**
**उत्तर –प्लॉट क्र–७१**

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**

## जाहीर नामा

जा क्र. / बीनप /कावि /वसुली –
कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक –//२०

**संपादक साहेब**
**दैनिक**
**बीड**
**ख खत, ७११२**

प्रकरण मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरुस्ती) बाबत.

**अर्जदाराचे नाव व पत्ता सुषमा विनोद गायकवाड**
**राहणार बीड**

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. १–४–२७११, १/४/२७१२ सव्हे नं.– ५२ पैकी तरफ गिराम क्षेत्र–९० चौ.मी प्लॉट क्र ५५,५६

**श्री/सौ. सुमित मधुकर गवते बीड**

चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयांत नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

**चतु: सिमा**
**पूर्व – प्लॉट क्रमांक ४१ व ४२**
**पश्चिम – सहा मीटर रुंदीचा रस्ता**
**दक्षिण – प्लॉट क्रमांक ५१९**
**उत्तर–लाहोटी यांची जागा**

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**

## जाहीर नामा

जा क्र. / बीनप /कावि /वसुली –
कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक –//२०

**संपादक साहेब**
**दैनिक**
**बीड**
**ख .खत , ७११२**

प्रकरण – मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता अजमल जराम तुकाराम नौराळे राहणार–बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. १/१/९४५९ सहे नं.– सव्हे नं.– १८७/अ तरफ पिंगळे प्लॉट क्र–२४
पैकी क्षेत्र – १२३.९० चौ.मो

**वर श्री/सौ.राजेश विमलचंद पोरवाल व इतर**

चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरुस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

**चतु: सिमा**
**पुर्व –प्लॉट क्रमांक ३१**
**पश्चिम –९ मी रुंदीचा रस्ता**
**दक्षिण– प्लॉट क्र–२३**
**उत्तर – प्लॉट क्रमांक–२५**

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**

## जाहीर नामा

जा क्र. / बीनप /कावि /वसुली –
कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक –//२०

**संपादक साहेब**
**दैनिक**
**बीड**

**ख. खत, ७११२.**

प्रकरण – मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरुस्ती) बाबत.

**अर्जदाराचे नाव व पत्ता भाग्यश्री ज्ञानेश्वर तळेकर**
**राहणार–बीड**

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, घर क्र. १/४/७२३७ सव्हे नं.–३०१ अ तरफ देशमुख पैकी प्लॉट क्रमांक दोन पूर्ण व प्लॉट क्रमांक तीन पैकी क्षेत्र ७८.७५ चौरस मीटर

**श्री/सौ. दिपाली कुंडलीक बादाडे बीड**

चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे/ नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरुस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

**चतु: सिमा**
**पूर्व – राहुल गिराम यांची जमीन**
**पश्चिम वीस फुटाचा रस्ता**
**दक्षिण सौपुष्पा प्रकाश गोरे यांचा प्लॉट**
**उत्तर प्लॉट क्रमांक एक**

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**

# भाजपचे नगरसेवक मनोज घोंगडे यांची बीड न.प. प्रशासनाकडे मागणी

**लोकनायक वृत्तसेवा –** बीड (प्रतिनिधी) : शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षम व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक मनोज घोंगडे यांनी बीड नगरपरिषदेच्या नियोजन व विकास समितीकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनात ओपन स्पेसचे व्यवस्थापन, कंपाउंड बांधकाम तसेच गायरान जमिनींच्या नियोजनाचा समावेश आहे.निवेदनात पुढे म्हटले की, शहरातील प्रत्येक वॉर्डमधील ओपन स्पेसची स्वतंत्र नोंद ठेवून त्याची माहिती संबंधित नगरसेवकांना देण्यात यावी. या जागांवर अतिक्रमण होऊ नये यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे.



तसेच नागरिकांच्या हितासाठी या मोकळ्या जागांचा योग्य व नियोजनबद्ध वापर व्हावा, यावर भर देण्यात आला आहे. याशिवाय, शहरातील प्रत्येक ओपन स्पेसभोवती कंपाउंड उभारण्यात यावे, जेणेकरून त्या जागांचे संरक्षण होईल आणि अतिक्रमणाला आळा बसेल. यामुळे शहराच्या नियोजनात शिस्त राहून नागरिकांना सुरक्षित मोकळी जागा उपलब्ध होईल. तसेच, शहरातील गायरान जमिनींवर घरकुलांसाठी भूखंड वाटप करताना प्रक्रिया सुलभ व पारदर्शक ठेवावी. गायरान जमिनींचे वाटप करताना नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ते सहकार्य करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या तिन्ही मागण्यांची अंमलबजावणी झाल्यास शहरातील नियोजन, पारदर्शकता आणि नागरिकांच्या सोयीसुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, बीड नगरपरिषद प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# स्त्री शिक्षणाचे प्रणेते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा सर्वांनी आदर्श घ्यावा. –सौ शीलाताई सुखदेव उजगरे यांचे प्रतिपादन

वडवणी लोकनायक वृत्तसेवा:– मौजे पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड येथे ,,छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड, येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती फार मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणामध्ये साजरी करण्यात आली ..सर्वप्रथम क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन वाचनालयाचे सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर व ग्रंथपाल सौ सीलाताई सुखदेव उजगरे यांनी केले. याप्रसंगी शाळेतील बऱ्याच विद्यार्थी विद्यार्थिनीने महात्मा फुले यांच्या जीवनावर आपले अनमोल विचार मांडले.. त्यानंतर ग्रंथपाल सौ.शिलाताई सुखदेव उजगरे ,यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, सर्वांसाठी शिक्षण हे किती महत्त्वाचे आहे ,शिक्षणामुळे, ज्ञानामुळे कशाप्रकारे प्रगती साधली जाते, व मानवाचा विकास शिक्षणामुळेच होतो हे सर्वप्रथम जर कोणी जाणले असेल तर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी जाणले होते.. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाबरोबरच सर्वांच्या शिक्षणाचा सर्वतोपरी विचार केलेला आहे ..उच्च वर्णयातील शिक्षक वर्ग हा कोणालाही शिकवण्यास तयार नव्हता.. आणि शिक्षकच जर नसतील तर मग विद्यार्थी कसे घडतील ? हा विचार सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांनी केला ..त्यांनी स्वतःच्या घरातूनच शिक्षण द्यायला सुरुवात



करण्याचा निश्चय केला.. आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना त्यांनी सर्वप्रथम शिक्षणाकडे वळवले.. सर्वप्रथम महात्मा फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षण दिले.. त्यांना प्रशिक्षित केले .. कोणालाही न जुमानता त्यांनी पुण्यासारख्या भिडे वाड्यातील मुख्य ठिकाणी मुलींचे वर्ग सुरू केले.. तेव्हापासून खऱ्या अर्थाने शिक्षणाला सुरुवात झालेली आहे ..सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी खऱ्या अर्थाने सर्वांसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिलेली आहे ..व पुढे छत्रपती शाहू महाराज यांनी शिक्षणासंबंधी मौलिक कार्य करून सर्वांना शिक्षण सक्तीचे केले.. पुढे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिबा फुले यांचा वारसा घेतला .. महात्मा फुले सारख्या विद्वान व्यक्तींना गुरु मानून सर्वांसाठी समान शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली ..यामुळे सर्व समाजाची प्रचंड प्रगती झालेली आहे.. आज सर्व स्त्रिया व पुरुष मंडळी फार मोठ्या प्रमाणामध्ये शिक्षण घेऊन आपली उन्नती करीत आहे.. खऱ्या अर्थाने अशा महान विचारवंताचे कार्य सतत सर्वांनी जोपासणे आवश्यक आहे.. व त्यांच्या कार्याची ओळख सर्वांनी करून घेणे गरजेचे आहे व त्यांच्या विचाराप्रमाणे सर्वच जाती–धर्मातील लोकांनी वागणे गरजेचे आहे.. म्हणून वाचनालयातील विद्यार्थ्यांनी महापुरुषांचे विचार जास्तीत जास्त आत्मसात करावेत.. वाचनातील साहित्याबरोबरच महापुरुषांच्या विचाराचा वारसा आपल्या घराघरांमध्ये जपावा.. आणि आपली आपल्या कुटुंबाची आपल्या देशाची प्रगती करण्यासाठी सतत प्रयत्न करावे ..असे प्रतिपादन आयु.सौ. शीलाताई सुखदेव उजगरे यांनी याप्रसंगी केले.. यानंतर सदरील कार्यक्रमांमध्ये विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी राम माळी हिचा वाढदिवस या कार्यक्रमांमध्ये साजरा करून तिलाही वाढदिवसाच्या निमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.. यानंतर खळगे सर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले ..व सर्वांना अल्प उपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली ..या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक शालेय विद्यार्थी व आजूबाजूच्या परिसरातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# मेलडी क्वीन आशाताई काळाच्या पडद्याआड



**लोकनायक वृत्तसेवा –** गेली सात दशके आपल्या जादुई स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा रविवार दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वावरच नाही तर संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. आशाताईच्या निधनाने केवळ संगीत विश्वाचीच नाही तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने संगीत विश्वाला वाहून घेतलेला आणि आपल्या जादुई स्वरांनी संपूर्ण संगीत विश्वावर अधिराज्य गाजवणारा शेवटचा तारा निखळला. भारतीय संगीत विश्व ज्यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही अशा मोजक्या कलाकारात त्यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. ८ सप्टेंबर रोजीच आशाताईचा ९२ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी त्यांचा उत्साह पाहता त्या वयाची शंभरी पार करतील असेच वाटत होते पण नियतीला हे मान्य नव्हते असेच म्हणावे लागेल. वयाच्या ९० व्या वर्षी त्यांनी ३ तासांचा संगीत कार्यक्रम केला होता असे कोणाला सांगितले तर कोणाचा त्यावर विश्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईमध्ये वयाच्या नव्वदीतही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा होती. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी होती की त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. तीन वर्षापूर्वी २४ मार्च २०२३ रोजी आशाताईना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आले होते तेव्हा संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला होता. यावेळी तेव्हाचे उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेले अनेक पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है हे गाणे गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईच्या संगीत कलेचा प्रवास आज थांबला. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरुवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले ग ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही गायली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्चर्य आहे. त्यांच्या निधनाने संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणारी मेलडी क्वीन काळाच्या पडद्याआड गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मेलडी क्वीन आशाताईना भावपूर्ण श्रद्धांजली!

लोकनायक

सोमवार दि.१३ एप्रिल २०२६

३

# गैरप्रकार चव्हाट्यावर आणल्याने पुजाऱ्यावर सूड उगविण्याचा प्रयत्नघर पाडण्यासाठी नगर परिषदेच्या माध्यमातून दिली नोटीस

यवतमाळ लोकनायक वृत्तसेवा : यवतमाळ येथील केदारेश्वर महादेव मंदिरातील गैरप्रकार चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न केल्यामुळे मंदिराचे सचिव राजेश राव आता पुजाऱ्यावर सूड उगविण्याचा प्रयत्न करीत आहे. नगर परिषदेच्या माध्यमातून गिरी परिवाराला महादेव मंदिर परिसरात राहत असलेले घर काढून टाकण्याबाबत नोटीस देण्यात आलेली आहे. आठ पिढ्यापासून या मंदिरात पुजारी म्हणून काम करीत असताना नेमकी आताच नोटीस कशी आली असा प्रश्न मंदिर परिसरात राहणाऱ्या पुजारी श्रीमती रूपा गिरी यांनी उप- स्थित केला आहे.श्रीमती रूपा प्रमोद गिरी यांच्या परिवाराचे आठ पिढ्या- पासून महादेव मंदिर परिसरातील घरात वास्तव्य आहे. मंदिराच्या मालमत्ता पत्रकात सुद्धा त्यांच्या नावाची नोंद आहे. केदारेश्वर मंदिरात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू असल्यामुळे त्यांनी हा प्रकार चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न केला आहे. केदारेश्वर मंदिरात मोठ्या प्रमाणात बिना परवानगी अवैध बांधकाम करण्यात आल्यामुळे अमोल कोमावार यांनी सुद्धा पुरातत्व विभागाकडे तक्रारी केल्या आहे. या तक्रारीची दखल घेत दोन वर्षांपूर्वीच पुरातत्व विभागाने पाहणी करून हे अवैध बांधकाम पाडण्याचे आदेश दिले आहे. या मंदिरात असलेले दीड हजार वर्षे जुने पुरातन कुंड सुद्धा बुजवून टाकण्यात आले. या कुंडातील जवळपास १०० कासव कुठे गेले याचा पत्ता लागलेला नाही. पुरातत्त्व विभागाची परवानगी न घेताच तोडफफोड करण्यात आली. त्यामुळेच तक्रारीची दखल घेत पुरातत्व विभागाने पाहणी करून अवैध बांधकाम पाडण्याचे आदेश दिले, मात्र जिल्हा प्रशासनाने या आदेशाची दखल घेतली नाही.



त्यामुळे सदर प्रकरण आता विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्याकडे दाखल करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या महाशिवरात्री दरम्यान केदारेश्वर मंदिराचे सचिव राजेश राव यांनी स्वतःचा क्यूआर कोड मंदिर परिसरात लावून भक्तांकडून मिळणाऱ्या देणग्या स्वतःच्या अकाउंट मध्ये जमा करून घेतल्या. याबाबत सुद्धा धर्मदाय आयुक्ताकडे कारवाईसाठी तक्रार करण्यात आली आहे. आठ दिवस पूर्वीच शासनाच्या जमिनीवरील गौण खनिज जेसीबी तसेच चार टिप्परच्या माध्यमातून चोरून नेण्यात आले. या प्रकरणात सुद्धा यवतमाळच्या तहसीलदारांनी राजेश राव यांना सोमवारी बोलाविले आहे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी माहिती वृत्तपत्रांना दिली होती. मात्र नंतर स्थळ पंचनाम्यातून राजेश राव यांचे नाव वगळण्यात आले. सदर प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती घेऊन कारवाई करणार असल्याचे सांगितले. एकंदरीत केदारेश्वर मंदिरात सचिव राजेश राव यांच्याविरुद्ध आवाज उठवत असल्यामुळेच तसेच अमोल कोमावार यांना माहिती देत असल्याच्या संशयावरून नगर परिषदेच्या माध्यमातून आपल्याला घर पाडण्यासंदर्भात नोटीस दिल्याचा

## इशारा देण्याचा प्रयत्न

केदारेश्वर मंदिरापासून वाहणारा नाला खूप दुरून वाहत येतो. शहराच्या मध्यभागातून वाहत जाणाऱ्या या नाल्याच्या बाजूला शंभर वर्षापासून अनेकांची घरे आहेत. या घरांचा नाल्यातून वाहणाऱ्या पाण्याला कुठेही अडथळा होत नाही. केदारेश्वर मंदिराच्या समोरच याच नाल्यावर पंचवीस वर्षापासून वगारे आर्ट गॅलरी आहे. गिरी यांचा परिवार आठ पिढ्यापासून याच ठिकाणी राहत असताना नेमके याच वेळेवर त्यांना नोटीस देण्यात आली आहे. नोटीसवर तक्रार कर्ता म्हणून पहिले राजेश राव यांचे नाव लिहिले होते मग ते अस्पष्टपणे खोडून त्यावर शुभम चव्हाण यांचे नाव लिहिण्यात आले. हा सर्व प्रकार तक्रार कराल तर तुमचे हाल करू असा संदेश देण्यासाठी करण्यात आल्याचा आरोप गिरी परिवाराने केला आहे.

## बंदूक रोखल्याची तक्रार प्रलंबित

दोन वर्षांपूर्वी मध्यरात्री केदारेश्वर मंदिर परिसरात खोदकाम केले जात होते. या खोदकामाला विरोध केल्यामुळे राजेश राव यांनी आपल्यावर बंदूक रोखली असा आरोप रूपा गिरी यांनी करून यवतमाळ शहर पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. या तक्रारीवर अजूनही पोलिसांनी कारवाई केलेली नाही. शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी आमचे घर मोकळे करून घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप गिरी परिवाराने केला आहे.

# ।। स्वच्छ गेवराई, सुंदर गेवराई ।।।। संकल्प विकासाचा, ध्यास स्वच्छतेचा ।।

**लोकनायक वृत्तसेवा** – गेवराई प्रतिनिधी कामराज चाळक गे- वराई शहराचा कायापालट व्हावा आणि आपले शहर सुंदर,स्वच्छ व आरोग्यदायी असावे, हे आदरणीय बाळराजे दिर्दो पवार यांचे स्वप्न आहे.पवार घराण्याचा इतिहासच असा आहे की,जेव्हा विषय गे- वराई शहराच्या विकासाचा येतो,तेव्हा हे कुटुंब सदैव सक्रियपणे मैदानात उतरून काम करते.आज याच परंपरेला पुढे नेत,गेवराई नगर परिषदेच्या कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा आदरणीय गीताभाभी बाळराजे पवार यांनी आज शहराच्या गणेश नगर,संघमित्र नगर तसेच विविध





भागांत स्वतः फिरून स्वच्छता मोहिमेची आणि साफसफाई कामाची प्रत्यक्ष पाहणी केली.या पाहणी दौऱ्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये:ह्व संवाद आणि आप- ुलकी: केवळ पाहणीच केली नाही,

तर भर उन्हात काम करणाऱ्या आपल्या सफाई कामगार भगिनी आणि बांधवांशी आदरणीय भाभींनी आपुलकीने संवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडवण्याचे आश्वासनही दिले.ह्व नागरिकांशी संपर्क: शहरातील विविध भागांना भेटी देऊन नागरिकांशी चर्चा केली. शहराच्या स्वच्छतेबाबत कोणाला काहीही अडचण असेल,तर थेट माझ्याशी संपर्क साधावा,असे आवाहन त्यांनी यावेळी केले.ह्वप्रशासकीय तत- परता: स्वच्छतेच्या कामात कुठेही हलगर्जीपणा चालणार नाही, अशा स्पष्ट सूचना यावेळी संबंधित विभागाला देण्यात आल्या.यावेळी त्यांच्यासोबत स्थानिक महिला व नागरिक उपस्थित होत्या.गेवराई शहराला महाराष्ट्रातील एक आदर्श आणि स्वच्छ शहर बनवण्यासाठी आदरणीय गीताभाभी रात्रंदिवस प्रयत्नशील आहेत. प्रशासकीय बळ आणि लोकसहभागाच्या जोरावर आपण नक्कीच 'स्वच्छ व सुंदर गेवराई' साकारू!



लोकनायक वृत्तसेवा.माजलगाव –स्त्री शिक्षण आणि समतेची मशाल पेटवनारे क्रांती सूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती लोक नेते सुंदररावजी सोळंके,तेल- गाव कार्यालयात साजरी करण्यात आली. प्रतिमेस पुष्पाजंली अर्पण करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड सह विष्णु मोरे,रामदास आगे,बालाजी सुरवसे, विठ्ठल पौळ,ज्ञानेश्वर ठोंबरे,नानाभाऊ वाघचौरे,दिगंबर विर.

## महात्मा फुले यांचे समतेचे विचार घराघरात पोचवा. - डॉ.रामपाल धारकर महाराज.

लोकनायक वृत्तसेवा.माजलगाव – क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी रात्री ७:३०वा.छत्रपती शिवाजी महाराज चौक,माजलगाव येथे व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, माजलगाव शहर व परिसरातील हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून समतेच्या विचारांचा लाभ घेतला.कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. रामपाल धारकर महाराज यांनी मार्गदर्शन केले त्यांनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांची प्रभावी मांडणी करत समाजात समता,शिक्षण आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व अधोरेखित करुन म्हणाले की,महात्मा फुले यांचे समतेचे



विचार घराघरात पोहोचवणे ही काळाची गरज आहे. यावेळी बहुजन विकास मोर्चाचे बाबुराव पोटभरे,भाजप नेते ज्ञानेश्वर मेंडके, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले,माजी नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



लोकनायक वृत्तसेवा.माजलगाव – कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करतांना उपसभापती श्रीहरी मोरे,सचिव हरिभाऊ सवणे व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव.

## भरधाव ट्रकच्या धडकेत युवकाचा मृत्यू

**लोकनायक वृत्तसेवा** –परळी ते गंगाखेड रोडवरील उड्डाणपुल परिसरात शनिवारी (११ एप्रिल) रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास एका भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत २९ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी पोलीस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार, सचिन सुधाकर सटाले (वय २९, रा. तडोळी, ता. परळी) असे या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्याचे वडील माणिक रामकृष्ण सटाले यांनी फिर्याद दिली आहे. शनिवारी संध्याकाळी ७.३० च्या सुमारास परळी ते गंगाखेड रोडवरील एकमिना चौक ते उड्डाणपुल दरम्यान हा अपघात घडला. आरोपी ट्रक चालक दाऊद मोहम्मद शेख (रा. मलीकपुरा, परळी) हा आपल्या ताब्यातील ट्रक (क्र. चक४४ ण ०६१९) भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवत होता. या ट्रकने सचिन याच्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. या भीषण अपघातात गंभीर जखमी झाल्यामुळे सचिनचा मृत्यू झाला. या घटनेनंतर पोलिसांनीट्रक चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) च्या कलम २८१ आणि १०६ (१) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक ढोणे यांच्या मार्गदर्शनाखाली पो- लीस उपनिरीक्षक शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## क्रांतीसूर्याच्या जयघोषाने भोकरदन 'नारिंगी'मय; जनसा- गराचा जल्लोष आणि 'जय ज्योती-जय क्रांती'चा गजर!

**लोकनायक वृत्तसेवा** – विद्येची आराध्यदेवता आणि दीन-दलितांचे कैवारी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती शनिवारी भोकरदन शहरात ऐतिहासिक उत्साहात साजरी झाली. सकल माळी समाजाच्या वतीने आयोजित या सोहळ्याने शहराच्या सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडवले. सकाळपासून सुरू झा- लेला हा उत्साहाचा महाकुंभ रात्री उशिरापर्यंत अवघ्या भोकरदनकरांना मंत्रमुग्ध करून गेला.मान्यवरांची मांदियाळी आणि अभिवादनाचा पूरसकाळी महात्मा फुले चौक येथे जयंतीचा मुख्य सोहळा पार पडला. नियोजित स्मारकाच्या ठिकाणी महापुरुषाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना अवघा परिसर भारावून गेला होता. यावेळी भोकरदन-जाफ्राबाद मतदारसंघाचे आमदार संतोषराव पाटील दानवे, सोबतच शहराचे नव निर्वाचित नागराध्यक्ष शमीम भाई मिर्झा, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ देशमुख,आशाताई माळी,हर्षकुमार जाधव, विकास जाधव, व्यापारी संघांचे महादू शेठ डोभाळ, योगेश शर्मा,नगरसेवक, राजेश सहाणे, दीपक मोरे, रामदास पाथरे, सुमित थारेवाल, रमेश जाधव, संतोष अन्नदाते,सोबत अनेक राजकीय नेत्यांनी कार्यकर्ते यांनी



हजेरी लावत अभिवादन केले. त्यांच्यासह राजकीय पटलावरील दिग्गज, आजी-माजी लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि पत्रकार बांधवांनी उपस्थित राहून महापुरुषाला कृतज्ञतापूर्वक नमन केले.शेकडो महिलांचा सहभाग; बँडच्या तालावर शहर थिरकलेखऱ्या अर्थाने आकर्षण ठरली ती सायंकाळी निघालेली भव्य शोभायात्रा ७ वाजता निघालेल्या या मिरवणुकीत महिलांचा सहभाग डोळ्यांचे पारणे फेडणारा होता. पारंपरिक वेशभूषा, हातात क्रांतीचे झेंडे आणि मुखात जय ज्योती-जय क्रांती'चा नारा देत अवघा समाज रस्त्यावर उतरला होता. बँड पथकाने वाजवलेल्या स्फूर्तिगीतांनी तरुणाईसह अबालवृद्धांनी ठेका धरला. मिरवणूक जसजशी पुढे सरकत होती, तसतसा जनसागर वाढत गेला.आमदारांचा मिरवणुकीत जल्लोषरात्रीच्या वेळी आमदार संतोषराव दानवे यांनी पुन्हा एकदा मिरवणुकीत सहभाग घेतला. यावेळी त्यांचा समाज बांधवांसोबतचा जल्लोष आणि आनंद बघण्यासारखा होता. लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यातील हा जिव्हाळा या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य ठरले.शिस्तबद्ध नियोजन आणि प्रशासकीय साथही मिरवणूक महात्मा फुले चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि सराफा बाजार मार्गे मार्गस्थ झाली. या भव्य सोहळ्यात कोणतीही गालबोट लागू नये म्हणून पोलीस प्रशासनाचे बीट जमादार बी. टी. सहाणे व पोलीस हेड कॉन्स्टेबल विजय देशपांडे यांनी खडा पहारा दिला. महावितरण विभागानेही सतर्क राहून चोख सुरक्षा पुरवली.सावता मंदिरात महाप्रसादाने सांगतामिरवणुकीचा समारोप रात्री ११ वाजता पोस्ट ऑफिस परिसरातील सावता मंदिर येथे झाला. या ठिकाणी उपस्थित हजारो समाज बांधवांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. एक समाज, एक जयंती' या भावनेतून सकल माळी समाजाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने आणि पदाधिकाऱ्याने घेतलेल्या अथक परिश्रमामुळेच ही जयंती भोकरदनच्या इतिहासात मैलाचा दगड ठरली आहे.


## औषधासाठी भारत चीनवर का अवलंबून आहे? भारतातील औषध टंचाईचे वास्तव:डॉ. भारत कऱ्हाड

**लोकनायक वृत्तसेवा** – जामखेड अजय अवसरे भारत हा जगातील ङ्गऔषधनिर्मितीचे केंद्रङ्ख म्हणून ओळखला जातो. स्वस्त, दर्जेदार आणि मोठ्या प्रमाणावर औषधे तयार करण्याची क्षमता भारताने निर्माण केली आहे. तरीदेखील एक महत्त्वाचा विरोधाभास असा आहे की औषध तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या घटकांसाठी भारत मोठ्या प्रमाणावर चीन या देशावर अवलंबून आहे. या अवलंबित्वामुळे देशाच्या आरोग्य व्यवस्थेवर आणि औषध पुरवठ्यावर गंभीर परिणाम होतात.औषधनिर्मितीमध्ये सर्वात महत्त्- ाचा घटक म्हणजे सक्रिय औषधी घटक, ज्याला एपीआय (अल- ीेंळींश झहरीारलशीींळलरश्र खपसीशवळशपीं) असे म्हणतात. हेच औषधाचे मूळ प्रभावी रसायन असते. भारतात तयार होणाऱ्या अनेक औषधांसाठी लागणारा हा कच्चा माल सुमारे ६५ ते ७० टक्के प्रमाणात चीनमधून आयात केला जातो. यामागील कारणे आर्थिक आणि तांत्रिक स्वरूपाची आहेत. चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते, उत्पादन खर्च कमी असतो, आणि सरकारकडून उद्योगांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे भारतीय औषध कंपन्यांसाठी चीनमधून कच्चा माल आयात करणे अधिक स्वस्त आणि सोयीचे ठरते.याउलट भारतात सक्रिय औषधी घटक उत्पादन करण्यासाठी अनेक अडचणी आहेत. वीज, मजुरी आणि यंत्रसामग्रीचा खर्च तुलनेने जास्त आहे. पर्यावरणीय नियम कडक असल्यामुळे उत्पादन खर्च आणखी वाढतो. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा अद्याप सर्वत्र विकसित झालेल्या नाहीत. १९९१ नंतरच्या आर्थिक उदारीकरणानंतर आयात स्वस्त झाल्याने भारतीय कंपन्यांनी कच्चा माल तयार करण्याऐवजी तयार औषधे बनवण्यावर अधिक भर दिला. त्यामुळे स्थानिक सक्रिय औषधी घटक उद्योग हळूहळू कमी झाले आणि चीनवरील अवलंबित्व वाढले.याच अवलंबित्वाचा थेट परिणाम म्हणजे औषधांची टंचाई. चीनमधील उत्पादनात अडथळे आले, जसे की कोविड-१९ काळातील लॉकडाउन किंवा इतर कारणांमुळे कारखाने बंद राहणे, तर भारतात कच्चा माल कमी पडतो. यामुळे औषधांचे उत्पादन घटते. त्याचबरोबर पुरवठा साखळीतील अडथळेङ्ग वाहतूक, कंटेनरची कमतरता, बंदरांवरील विलंबङ्खयांमुळे औषधे वेळेवर उपलब्ध होत नाहीत. महामारी किंवा हंगामी आजारांमुळे औषधांची मागणी अचानक वाढल्यास परिस्थिती अधिक गंभीर बनते. याशिवाय सरकारकडून काही औषधांवर लावलेले किंमत नियंत्रण हेही एक कारण ठरते, कारण कमी नफ्यामुळे काही कंपन्या उत्पादन कमी करतात.या समस्येची जाणीव झाल्यानंतर भारत सरकारने स्वावलंबनाच्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना, बल्क ड्रग पार्कस उभारणी, आणि देशांतर्गत सक्रिय औषधी घटक उत्पादन वाढवण्याचे प्रयत्न यांमुळे भारत हळूहळू चीनवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहे.एकूणच, भारत औषधनिर्मितीत सक्षम असला तरी कच्च्या घटकांसाठी परदेशावर, विशेषतः चीनवर अवलंबून असणे ही एक मोठी धोरणात्मक कमजोरी आहे. औषध टंचाई टाळण्यासाठी स्थानिक उत्पादन वाढवणे, तांत्रिक क्षमता विकसित करणे आणि दीर्घकालीन नियोजन करणे अत्यावश्यक आहे. स्वावलंबी भारत ही केवळ संकल्पना नसून देशाच्या आरोग्य सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक दिशा आहे.डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.



## माजलगावात आज पोलीस प्रशासन व शिव- फुले-आंबेडकर अनुयायां कडून समता ज्योत रॅली.

लोकनायक वृत्तसेवा.माजलगाव -विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती १४एप्रिल रोजी जगभर थाटामाटात साजरी करण्यात येणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून समतेची ज्योत पेटवली त्याच अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी पोलीस प्रशासन, माजलगाव व शिव- फुले-आंबेडकर अनुयायां कडून आज १३एप्रिल सोमवार रोजी च्या रात्री ११वा.छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक,भीमनगर पर्यंत समता रॅली निघणार आहे. याचे उद्घाटन गौरव इंगोले,उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्या हस्ते करण्यात येणार असुन यात राहुल कुमार (भाप- ोसे) प्रभारी ग्रामीण पोलीस ठाणे, राहुल सुर्यतळ पोलीस निरीक्षक, माजलगाव शहर हे त्यांचे सर्व अधिकारी,पोलीस कर्मचाऱ्यां सह सहभागी होणार आहेत.या समता ज्योत रॅलीत समस्त शिव-फुले-आंबेडकर अनुयायांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशी विनंती पोलीस प्रशासन माजलगाव व शिव-फुले- आंबेडकर अनुयायांनी केली



लोकनायक

सोमवार दि.१३ एप्रिल २०२६

४

























## सुचना

दैनिक बीडचा लोकनायक वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल लोकनायक वृत्तपत्र समुह जबाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.




This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com